|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

परीक्षा गोपनिय उत्तरार्ध विभाग

जा.क्र.कबचौउमवि/७-आय/ 2724 /२०२६ दि.३१/०८/२०२६

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न असलेल्या
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक,
मा. संचालक/ मा. विभागप्रमुख, सर्व प्रशाळा, कबचौ उमवि, जळगाव

**विषय :- महाविद्यालयातील कायमस्वरूपी (Permanent) CAP Director व CAP Coordinator यांची माहिती सादर करण्याबाबत .**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विविध वर्गाच्या / अभ्यासक्रमाच्या **हिवाळी-२०२६ च्या लेखी परीक्षा Backlog सह** विद्यापीठाने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर Descriptive (दिर्घोत्तरी) पध्दतीने **दि. १६ नोव्हेंबर, २०२६ पासून** आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव मार्फत हिवाळी तसेच उन्हाळी परीक्षांच्या अनुषंगाने महाविद्यालयीन स्तरावर विविध तांत्रिक व परीक्षा संबंधी कामकाजासाठी **CAP Director** व **CAP Coordinator** यांची नियुक्ती करण्यात येते. यासाठी कायमस्वरुपी कार्यरत असलेले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याबाबत **शासनाचे निर्देश** प्राप्त झालेले आहेत.

तरी, सदर परीक्षा संबंधी कामकाजाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयामध्ये **कायमस्वरूपी** (Permanent) **CAP Director व CAP Coordinator** म्हणून काम करत असलेल्या कर्मचारी / अधिका-याची संपूर्ण माहिती **प्राचार्य / संचालक यांच्या स्वाक्षरी व महाविद्यालयाच्या शिक्क्यासह** **postexamkbcnmu@gmail.com** ई-मेल वर **तात्काळ** पाठवावी तसेच सदर माहितीची **Hard Copy** देखील परीक्षा गोपनीय उत्तरार्ध विभागात **त्वरीत** सादर करावी.

| महाविद्यालयाचे नाव / परिसंस्थेचे नाव | नियमित / (Permanent) CAP Director व CAP Coordinator यांचे संपूर्ण नाव | सध्याचे पदनाम | कायमस्वरूपी आहे काय? होय / नाही | शैक्षणिक पात्रता | मोबाईल क्र. ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

सादर केलेली माहिती महाविद्यालयाच्या अधिकृत अभिलेखानुसार अचूक व पूर्ण असल्याची खात्री करूनच सादर करावी. सदर माहितीमध्ये चुकीची अथवा अपूर्ण माहिती आढळल्यास, तसेच परीक्षेच्या गोपनीय कामकाजात कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा अडचण निर्माण होणार नाही, याची कृपया गांभीर्याने दक्षता घ्यावी. परीक्षा आयोजनाच्या गोपनीय कामकाजात महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर दिरंगाई अथवा अडचणी निर्माण झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी मा.प्राचार्य/संचालक यांची राहील, याची कृपया नोंद घेवून, परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती

कळावे,

आपला विश्वासू,

**(प्रा. योगेश पाटील)**
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**प्रत :** १. मा.कुलगुरू महोदय, कबचौ उमवि, जळगाव
२. मा.प्र-कुलगुरू महोदय, कबचौ उमवि, जळगाव